Maitri 32, Natraj Society, Karvenagar, Pune 411 052. India. Tel.: 91.20.25443134. email : maitri1997@gmail.com www.maitripune.net

१३ जूलै २०१५

प्रति

**श्री. नंदकुमार पटवर्धन यांस,**

सस्नेह नमस्कार.

"मैत्री"ला आसमंत बेनिव्होलन्स फाऊंडेशन (रत्नागिरी) यांच्याकडून रु. २१०००/- देणगीस्वरुपात मिळाले. **मन:पुर्वक धन्यवाद!**

सदर देणगीची रक्कम ही मेळघाटातील लहान मुले आणि गरोदर माता यांच्या आरोग्यविषयक कामासाठी वापरण्यात येईल.

१९९७ मधे मेळघाटमधे होणाऱ्या बालमृत्यूचं एकंदरीत महाराष्ट्रात असणाऱ्या तुलनेत असणारं प्रचंड प्रमाण पाहून "मैत्री"ने मेळघाटमधील अती दुर्गम अशा १२ गावांमधे बालकांच्या आरोग्य रक्षणासाठी आरोग्य कार्यक्रम सुरु केला.

प्रशिक्षित आरोग्य मैत्रिणीं प्रत्येक महिन्याला गरोदर स्त्रियांची नोंदणी, लहान मुलांमधे डायरिया, सर्दी, खोकला, साधा ताप, खरुज असे किरकोळ आजार ओळखणे व त्यांवर घरगुती उपाय करणे. त्याचप्रमाणे डायरिया, न्यूमोनिया अशा गंभीर स्वरुपाचे आजार ओळखणे त्यावरील प्राथमिक उपचार व संदर्भ सेवा पुरविणे (PHC मधे पाठविणे, PHC मधे उपचार मिळेल असे पहाणे, इ.) इत्यादी कामे करतात. याचा चांगला परिणाम गेल्या १२ वर्षांमधे दिसून आला आहे. दरवर्षी या गावांमधे मेळघाटमित्रकडून बालमृत्यूंसंदर्भात सर्वेक्षण केले जाते. आता या गावांमधील बालमृत्यूंचे प्रमाण बरेच कमी झाले आहे.

पावसाळ्यातील बालमृत्यू व कुपोषण रोखण्याची, आरोग्य शिक्षणाची 'धडक मोहिम' ही सुध्दा "मैत्री" च्या आरोग्य कार्यक्रमातलाच एक भाग आहे. दरवर्षीपमाणे यावर्षीही "मैत्री" ने मेळघाटात धडक मोहिमेचे आयोजन केले आहे. त्याची सविस्तर माहिती सोबत जोडत आहोत.

"मैत्री"चे सुरु असणारे उपक्रम व मेळघाटमधील घडामोडींविषयी आपल्याला आम्ही वेळोवेळी कळवत राहूच. आपल्याकडून "मैत्री"ला असाच पाठिंबा मिळत रहावा ही विनंती.

**पुन्हा एकदा मन:पूर्वक धन्यवाद.**

विनिता ताटके

**विनिता ताटके**
**स्वयंसेवक "मैत्री"**

**"मैत्री"**:३२,'कल्याण', नटराज सोसायटी, कर्वेनगर,पुणे ४११०५२ दूरध्वनी क्र. +९१-२०-२५४४३१३४, कार्यालय : +९१-२०-२५४५०८८२
Email : maitri1997@gmail.com www.maitripune.net नोंदणी क्र. ई २८९८ / पुणे.

MAITRI is a public trust formed by socially conscious citizens to address issues of common concern (Registration no. E-2898 / Pune)